# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ / फाल्गुन ५, १९४६ (शके)

**१०. म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय विधानपरिषद सदस्यांना कळविण्यात येते की :-**

**१.** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सोमवार, दिनांक ३ मार्च, २०२५ पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या सन २०२५ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनासाठी द्यावयाच्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना पूर्णत: **ONLINE** पद्धतीनेच मंगळवार, दिनांक ४ मार्च, २०२५ पासून **AMOIS** या संगणकीय प्रणालीवर महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे कार्यालय सुरु झाल्यापासून म्हणजेच सकाळी ९.३० वाजल्यापासून स्विकारण्यात येतील व विधानपरिषद सभागृहाची नियमित बैठक सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर बंद करण्यात येतील.

**२.** **ONLINE** पध्दतीने प्राप्त होणाऱ्या सूचनांना संगणकीय प्रणालीद्वारे आपोआपच अनुक्रमाने नोंदणी क्रमांक दिला जाईल.

**३.** महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये सूचनेचा विषय हा निकडीचा सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, एकाच विभागाशी संबंधित, मुद्देसूद व थोडक्यात ठेवून सूचनाधीन विषयाचा सारांश २ ते ३ ओळींमध्ये असणे आवश्यक आहे. तसेच सूचनेचा विषय ज्या विभागाशी संबंधित आहे त्या विभागाचे नांव स्पष्टपणे दर्शविण्यात यावे.

..२/-

**४.** अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण ५ दिवस अगोदरचा दिवस हा **ONLINE** पध्दतीने म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना स्विकारण्यासाठी अंतिम दिवस असेल.

**५.** म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा पूर्ण अधिकार मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचाच राहील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (का.)
महाराष्ट्र विधानपरिषद

**याची प्रत :-**

**१)** महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.

**२)** मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

**३)** मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

**४)** मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

**५)** मा.सचिव (१) (का.), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.

**६)** मा.सचिव (२) (का.), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.

**७)** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.

**८)** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

**९)** संगणक कक्ष (WEBSITE)

**१०)** एम.के.सी.एल. प्रशिक्षण विभाग.

---------